


पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी

मुंबई • वर्ष: 7 • अंक: 19 • 1 ऑक्टोबर 2025 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.

# बळीराजा पुन्हा उभा राहील...





## अध्यक्षीय मनोगत

# पूरग्रस्तांच्या पाठीशी भाजपा

**राज्यातील** अनेक जिल्ह्यांना परतीच्या पावसाने तडाखा दिल्यामुळे बीड, धाराशिव, सोलापूर, लातूर, नांदेड, जालना आदी जिल्ह्यांमध्ये मोठे संकट निर्माण झाले. प्राथमिक अंदाजानुसार २६ लाख हेक्टर शेतजमीन अतिवृष्टीमुळे बाधित झाली आहे. शेतकऱ्यांशी जनावरे वाहून जाण्याच्या घटनाही घडल्या आहेत. या अस्मानी संकटात बळीराजाच्या पाठीमागे संपूर्ण महाराष्ट्र निर्धाराने उभा आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्राथमिक मदत जाहीर केली आहे. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पहिल्या टप्प्यातील ही मदत जमाही झाली आहे. या संकटाची व्याप्ती प्रचंड मोठी आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या नुकसानीचा संपूर्ण अंदाज येण्याची प्रतिक्षा करत आहेत. त्यानंतर केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव सादर केला जाणार आहे. दिवाळीच्या आधी शेतकऱ्यांना मदत पोहचावी, असे नियोजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. पंचनामे, पाहणी वगैरे शासकीय प्रक्रियेची वाट न पाहता पहिल्या टप्प्यात शेतकऱ्यांना मदत देण्याचा शब्द फडणवीस सरकारने पाळला आहे. या संकटाच्या काळात केंद्र सरकारकडून अधिकाधिक मदत मिळवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नुकतीच भेट घेतली. सरकार आणि स्वयंसेवी संस्थांकडून अतिवृष्टीग्रस्तांना मदत मिळेलच. भारतीय जनता पार्टीतर्फे संघटनेच्या माध्यमातून पूरग्रस्तांना सर्वतोपरी सहाय्य करण्यासाठी आपण नियोजन केले आहे. हजारो शेतकऱ्यांचा संसार वाहून गेला आहे. त्यामुळे त्यांना दैनंदिन गरजेच्या वस्तूंसह अनेक बाबतीत सहाय्य करावे लागणार आहे. हे सहाय्य करताना कोठेही आपल्या पक्षाची, एखाद्या पदाधिकाऱ्याची, लोकप्रतिनिधीची जाहिरात होणार नाही, याकडे आवर्जुन लक्ष दिले पाहिजे. अन्य गोष्टींकडे लक्ष न देता सर्व कार्यकर्त्यांनी पूरग्रस्तांना अधिकाधिक मदत कशी करता येईल, याला प्राधान्य देणे अपेक्षित आहे. निवडणूका, स्थानिक राजकारण वगैरे सारख्या गोष्टी वर्षभर चालूच असतात. या गोष्टी बाजूला ठेवून पूरग्रस्तांना मदत पोहचवण्यासाठी संपूर्ण ताकदीने मैदानात उतरले पाहिजे. 'सेवा ही संगठन' हे आपले ब्रीदवाक्य आहे. कोरोना काळात आपल्या कार्यकर्त्यांनी प्राणाची पर्वा न करता मदतकार्यात भाग घेतला होता. तीच धडाडी पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी आपले कार्यकर्ते दाखवतील, असा मला विश्वास आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा पंधरवडा' सुरू आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारने अलिकडेच केलेल्या जीएसटी दरकपातीबाबत जनजागृतीची मोहिमही सुरु आहे. राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांनी दिल्लीत व्यापारी वर्गाच्या भेटीगाठी घेऊन जीएसटी दरकपातीबाबत चर्चा केली. याच्याच बरोबरीने स्वदेशी वस्तूच्या खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठीचे अभियानही सुरु आहे. जीएसटी दरकपातीमुळे कोण-कोणत्या वस्तूंचे दर कमी होणार आहेत, याची माहिती या अंकात सविस्तरपणे देण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'जीएसटी दरकपात' आणि 'गर्व से कहो ये स्वदेशी है' या अभियानाबाबत जनतेशी अलिकडेच संवाद साधला. या संवादाचा संपादित अंशही या अंकात देण्यात आला आहे. कार्यकर्त्यांनी या दोन्ही विषयांची सखोल माहिती करून घेणे आवश्यक आहे. देशाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या आर्थिक सुधारणांची माहिती घरोघरी पोहचवणे हे आपले कर्तव्य आहे.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया, bjpmaha.manogat@gmail.com editor.bjpmanogat@gmail.com येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

बळीराजा पुन्हा उभा राहील... अधिक सक्षम, अधिक मजबूत! ०४



पूरग्रस्तांना भाजपाचा मदतीचा हात ०५



भारतात बनवलेली उत्पादनेच खरेदी करा: पंतप्रधान ०६



देशभर 'जीएसटी बचत महोत्सव' उत्साहात सुरु १०




मुंबई भाजपातर्फे एकाच दिवशी दीड लाख चष्म्यांचे वाटप १५




सौर ऊर्जा प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती ३१



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# बळीराजा पुन्हा उभा राहील... अधिक सक्षम, अधिक मजबूत!

● देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री



**महाराष्ट्रात** गेल्या काही दिवसांपासून सतत कोसळणाऱ्या पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा आणि लातूर जिल्ह्यातील औसा आणि निलंगा तालुक्यातील पूरग्रस्त भागांची पाहणी केली. शेतकऱ्यांची वाहून गेलेली पिकं-गुरंढोरं, घरांमध्ये शिरलेले पाणी, उद्ध्वस्त झालेले संसार हे सर्व पाहून मन विषण्ण झाले. अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान प्रचंड आहे, पण अशा संकटावर मात करण्याची ताकद महाराष्ट्राच्या मातीत आणि बळीराजाच्या मनगटात आहे आणि सरकार म्हणून आम्ही त्यांच्यासोबत आहोत. या आपत्तीत शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शेती, घरे, शाळा, रस्ते, सार्वजनिक सुविधा जेथे-जेथे मदतीची गरज आहे तेथे शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. आपली जवळची माणसं, पोटच्या लेकराप्रमाणे वाढवलेली पिकं, जनावरं जेव्हा डोळ्यासमोर वाहून जातात, तेव्हा त्यांच्या मनाला होणाऱ्या वेदनांची आम्हाला जाणीव आहे. म्हणूनच निकषात न अडकता जास्तीत जास्त मदत देण्याचा आमचा प्रयत्न आहे. नुकसानीची भरपाई करण्यासाठी शासनाने आधीच २२०० कोटींची तातडीची मदत दिली आहे, पुढेही गरजेनुसार निधी उपलब्ध करून देऊ.

### अतिवृष्टीच्या दृष्टीने शासनाने घेतलेले काही महत्त्वाचे निर्णय :

- टंचाई काळातील उपाययोजना अतिवृष्टीलाही लागू करणार.
- उजनी येथे तेरणा नदीवर पूल, गावाला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाला मंजुरी.
- औराद शहाजनी येथे पूर संरक्षक भिंत, बॅरेजेसची कामेही केली जाणार.
- उजनी गावालगत तेरणा नदीवर औसा व तुळजापूर तालुक्याला जोडणाऱ्या पुलाच्या उभारणीला मंजुरी देणार.
- उजनी गाव ते राष्ट्रीय महामार्गावरील उजनी मोडला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाला मंजुरी देणार.
- जेथे पंचनाम्यांसाठी पोहचणे शक्य नाही, अशा ठिकाणी ड्रोनद्वारे पंचनामे तसेच मोबाईलवरील फोटोही स्वीकारणार.

या कठीण काळात आपल्याला एकमेकांना धीर द्यावा लागेल. शासनाची सर्व यंत्रणा कार्यरत आहे, मदत पोहोचवली जात आहे आणि पुढेही आधारासाठी हात आखडता घेतला जाणार नाही. हे संकट तात्पुरते आहे बळीराजा पुन्हा उभा राहील आणि त्याच्यासोबत महाराष्ट्रही अधिक सक्षमपणे पुढे जाईल!

# पूरग्रस्तांना भाजपाचा मदतीचा हात



राज्यातील पूरग्रस्तांना प्रदेश भाजपातर्फे मदतीचा हात देण्यात आला आहे- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ.विक्रांत पाटील, आ.अमित गोरखे, प्रदेश मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, पुणे अध्यक्ष धीरज घाटे आदी.





किसान मोर्चातर्फे पूरग्रस्तांना १०० टन ओला चारा, सुका चारा, मूर घास पाठविण्यात येणार आहे. मिरज येथून या उपक्रमाचा प्रारंभ झाला. सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस संदीप गिड्डे-पाटील आदी यावेळी उपस्थित होते. माऊली हळणवर, रामदास कोळगे, नंदू मोरे यांनी स्थानिक वितरणाची जबाबदारी पार पाडली.




पुणे भाजपातर्फे पूरग्रस्तांसाठी ४५ हजार किलो अन्नधान्य रवाना करण्यात आले. यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आ.भीमराव तापकीर, शहर जिल्हाध्यक्ष धीरज घाटे आदी.

# भारतात बनवलेली उत्पादनेच खरेदी करा: पंतप्रधान



> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे देशाला संबोधित केले. शक्तीच्या उपासनेचे पर्व असलेल्या नवरात्रीच्या प्रारंभानिमित्त सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा देत ते म्हणाले की, नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासूनच देश आत्मनिर्भर भारत अभियानासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आहे. २२ सप्टेंबरपासून बरच देशात जीएसटीच्या नव्या दरांची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

पंतप्रधानांनी अधोरेखित केले की एका प्रकारे संपूर्ण भारतात जीएसटी बचत उत्सवाला सुरुवात होत आहे. या उत्सवामुळे बचत वाढेल आणि लोकांना त्यांच्या पसंतीच्या वस्तू खरेदी करणे सुलभ होईल यावर त्यांनी भर दिला. या बचत महोत्सवाचे लाभ देशातील गरीब, मध्यमवर्गीय, नवमध्यमवर्गीय, युवक, शेतकरी, महिला, दुकानदार, व्यापारी आणि उद्योजकांपर्यंत पोहोचतील.

या उत्सवाच्या काळात प्रत्येक घरामध्ये आनंद आणि गोडवा वाढेल असे त्यांनी नमूद केले. पंतप्रधानांनी देशभरातील कोट्यवधी कुटुंबांना नव्या पिढीच्या जीएसटी सुधारणा आणि जीएसटी बचत महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. या सुधारणा भारताच्या विकासगाथेला गती देतील, व्यवसाय सुलभ करतील, गुंतवणूक अधिक आकर्षक बनवतील आणि विकासाच्या शर्यतीत प्रत्येक राज्याला समान भागीदार बनवेल.

२०१७ मध्ये भारताने जीएसटी सुधारणांच्या दिशेने पहिले पाऊल उचलले, ज्यामुळे एका जुन्या अध्यायाचा अंत झाला आणि देशाच्या आर्थिक इतिहासात एका नवीन अध्यायाची सुरुवात झाली, याची आठवण करून देत, मोदी यांनी अधोरेखित केले की, अनेक दशकांपासून, देशभरात नागरिक आणि व्यापारी सीमाशुल्क, प्रवेश कर, विक्री कर, उत्पादन शुल्क, व्हॅट आणि सेवा करसारख्या डझनभर करांच्या जटिल जाळ्यात अडकले होते. पंतप्रधानांनी निदर्शनास आणून दिले की, एका शहरातून दुसऱ्या शहरात मालवाहतूक करण्यासाठी अनेक चेकनाके ओलांडून जावे लागत होते, असंख्य फॉर्म भरावे लागत होते आणि प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या कर नियमांच्या चक्रव्यूहातून जावे लागत होते. २०१४ मध्ये पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर एका परदेशी वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या एका उदाहरणाचा त्यांनी उल्लेख केला. बंगळुरूहून हैदराबादला ५७० किलोमीटर दूर माल पाठवणे किती कठीण होते, कंपनीसमोरील तेव्हाच्या आव्हानांचे वर्णन त्या लेखात केले होते. या अडचणींना कंटाळून त्यांनी बंगळुरूहून आधी युरोपला आणि नंतर तो माल हैदराबादला परत पाठवणे पसंत केले होते. अनेक कर आणि टोलच्या जाळ्यात अडकल्यामुळे देशात अशी परिस्थिती होती, असे पंतप्रधान म्हणाले. आधीचे उदाहरण हे लाखो



दिल्लीतील एका प्रदर्शनादरम्यान मातीपासून वस्तू बनविणाऱ्या कारागिराशी संवाद साधताना पंतप्रधान नरेंद्र मोदी.

घटनांपैकी फक्त एक आहे. अनेक करांच्या जटिल जाळ्यामुळे दररोज लाखो कंपन्या आणि कोट्यवधी नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. एका शहरातून दुसऱ्या शहरात वस्तूंच्या वाहतुकीचा वाढलेला खर्च शेवटी गरीब आणि सामान्य माणसासारख्या ग्राहकांनाच सोसावा लागत होता. त्यामुळेच देशात त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कर गुंतागुंतीतून देशाला मुक्त करणे अत्यावश्यक असल्याचे सांगत, मोदींनी आठवण करून दिली की, २०१४ मध्ये जनादेश मिळाल्यानंतर सरकारने लोक आणि देशाच्या हितासाठी जीएसटीला प्राधान्य दिले. सर्व संबंधितांशी व्यापक विचारविनिमय करण्यात आला, राज्यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक शंकेचे निराकरण करण्यात आले आणि प्रत्येक प्रश्नावर तोडगा काढण्यात आला. सर्व राज्यांना एकत्र आणून स्वतंत्र भारतातील एवढी मोठी कर सुधारणा शक्य झाली, असे त्यांनी नमूद केले. केंद्र आणि राज्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच देशाची अनेक करांच्या जाळ्यातून सुटका झाली आणि देशभरात एकसमान करप्रणाली स्थापन झाली, असे पंतप्रधानांनी सांगितले. 'एक देश-एक कर'चे स्वप्न साकार झाले.

सुधारणा ही एक सतत चालणारी प्रक्रिया असून, काळ बदलत असताना आणि देशाच्या गरजा विकसित होत असताना, पुढील पिढीच्या सुधारणाही तितक्याच आवश्यक ठरतात, असे पंतप्रधानांनी सांगितले. देशाच्या सद्यस्थितीतील गरजा आणि भविष्यातील आकांक्षा लक्षात घेऊन या नवीन जीएसटी सुधारणा लागू केल्या जात आहेत, यावर त्यांनी भर दिला. नवीन रचनेनुसार, फक्त ५% आणि १८% असे दोनच कर स्लॅब प्रामुख्याने राहतील. यामुळे, दैनंदिन वापराच्या बहुतेक वस्तू अधिक परवडणाऱ्या होतील, असे ते म्हणाले. अन्नपदार्थ, औषधे, साबण, टूथब्रश, टूथपेस्ट, आरोग्य आणि जीवन विमा यासह अनेक वस्तू आणि सेवा एकतर करमुक्त असतील किंवा त्यांच्यावर फक्त ५% कर आकारला जाईल, असे त्यांनी सांगितले. पूर्वी १२%, आणि ९९% - म्हणजे अक्षरशः सर्वच - कर असलेल्या वस्तू आता ५% कर श्रेणीमध्ये आणल्या गेल्या आहेत.


गेल्या अकरा वर्षांत २५ कोटी भारतीय दारिद्र्यातून बाहेर पडून देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावणारा एक महत्त्वाचा नव मध्यमवर्ग म्हणून उदयाला आले आहेत, असे ठळकपणे सांगत पंतप्रधानांनी या नव मध्यमवर्गाच्या

स्वतःच्या आकांक्षा आणि स्वप्ने आहेत यावर भर दिला. यावर्षी, सरकारने १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करून कर सवलतीची भेट दिली आहे, ज्यामुळे मध्यमवर्गीय लोकांच्या जीवनात लक्षणीय सुलभता आणि सोय आली आहे. आता गरीब आणि नव–मध्यमवर्गीयांची वेळ आली आहे, असे श्री. मोदी म्हणाले. गरीब आणि नवमध्यमवर्गीयांना दुहेरी फायदा मिळत आहे – प्रथम आयकर सवलतीद्वारे आणि आता कमी झालेल्या जीएसटीद्वारे. जीएसटीचे दर कमी झाल्यामुळे नागरिकांना स्वतःची स्वप्ने पूर्ण करणे सोपे होईल, मग ते घर बांधणे असो, टीव्ही किंवा रेफ्रिजरेटर खरेदी करणे असो, किंवा स्कूटर, बाइक किंवा कार खरेदी करणे असो – या सर्वांचा खर्च आता कमी होईल. तसेच, बहुतेक हॉटेल खोल्यांवरील जीएसटी कमी झाल्यामुळे प्रवास खर्चही सामान्य माणसाला परवडणारा होईल. जीएसटी सुधारणांना दुकानदारांकडून मिळत असलेल्या उत्साही प्रतिसादाबद्दल श्री. मोदी यांनी आनंद व्यक्त केला. जीएसटी कपातीचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ते सक्रियपणे काम करत आहेत. अनेक ठिकाणी सुधारणांपूर्वी आणि नंतरच्या किमतींची तुलना करणारे फलक प्रमुखपणे लावले जात आहेत.


'नागरिक देवो भव:' हा मंत्र पुढील पिढीच्या जीएसटी सुधारणांमध्ये प्रतिबिंबित होत असल्याचे अधोरेखित करून पंतप्रधानांनी, प्राप्तिकर सवलत आणि जीएसटी कपात एकत्रितपणे केल्यामुळे, गेल्या वर्षभरात घेतलेल्या निर्णयांतून देशातल्या नागरिकांची २.५ लाख कोटींपेक्षा अधिक बचत होणार आहे. म्हणूनच, याला 'बचत उत्सव' असे संबोधित करत असल्याचं ठाम प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी स्वावलंबी होण्याच्या मार्गावर अढळ वचनबद्धता आवश्यक आहे यांवर भर देताना श्री. मोदी यांनी भारताला आत्मनिर्भर बनवण्याची मोठी जबाबदारी एमएसएमई– भारताच्या सूक्ष्म, लघु आणि कुटीर उद्योगांवर असल्याचे सांगितले. लोकांच्या गरजा पूर्ण करणारे आणि स्वदेशात उत्पादित करता येईल असे जे काही असेल त्याचे देशांतर्गत उत्पादन केले पाहिजे.

जीएसटी दरांमध्ये कपात आणि सोप्या प्रक्रियांमुळे भारतातील एमएसएमई, लघु उद्योग आणि कुटीर उद्योग यांचा लक्षणीय फायदा होणार असल्याचे अधोरेखित



**दिल्लीतील एका प्रदर्शनादरम्यान लाकडी खेळणी बनविणाऱ्या कारागिराशी आणि बांधकामावर देखरेख ठेवणाऱ्या महिलेशी संवाद साधताना पंतप्रधान नरेंद्र मोदी.**



करताना पंतप्रधानांनी, या सुधारणांमुळे त्यांच्या विक्रीत वृद्धी होईल आणि त्यांच्यावरील करांचा बोजा कमी होईल, हा दुहेरी फायदा होणार असल्याचे स्पष्ट केले. श्री. मोदी यांनी लघु, मध्यम आणि सुक्ष्म उद्योगाकडून सरकारला मोठ्या अपेक्षा असल्याचे सांगितले. समृद्धीच्या शिखरावर असताना देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून या तीन उद्योगांची ऐतिहासिक भूमिका श्री. मोदी यांनी अधोरेखित



कुलूप बनविणाऱ्या कारागिर दांपत्याशी संवाद साधताना पंतप्रधान नरेंद्र मोदी.

केली. भारताचे उत्पादन आणि उत्पादन गुणवत्ता ही एकेकाळी जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त आणि उच्च दर्जाची असल्याचे त्यांनी नमूद केले. श्री. मोदी यांनी, तो अभिमान पुन्हा मिळवण्यावर भर देण्याची गरज व्यक्त करतानाच, लघु उद्योगांकडून निर्मित उत्पादनांनी सर्वोच्च जागतिक मानके पूर्ण केली पाहिजेत असे आवाहन केले. भारताच्या उत्पादनांनी सर्व निकष सन्मानाने आणि उत्कृष्टतेने पूर्ण केले पाहिजे आणि भारतीय उत्पादनांनी राष्ट्राची जागतिक ओळख आणि प्रतिष्ठा वृद्धिंगत केली पाहिजे. पंतप्रधानांनी सर्व हितधारकांना हे ध्येय मनात ठेवून काम करण्याचे आवाहन केले.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला स्वदेशीच्या मंत्राने बळकटी दिल्याचे सांगून, स्वदेशीचा मंत्रच देशाच्या समृद्धीच्या प्रवासाला ताकद देईल असे श्री. मोदी यांनी सांगितले. अनेक परदेशी वस्तू नकळतपणे दैनंदिन आयुष्याचा भाग झाल्याचेही पंतप्रधानांनी अधोरेखित केले. आपल्या खिशातील कंगवा परदेशी आहे की स्वदेशी आहे हे देखील नागरिकांच्या लक्षात येत नसल्याचे पंतप्रधान म्हणाले.

मोदी यांनी अशा अवलंबित्वापासून स्वतःला मुक्त करण्याच्या गरजेवर भर दिला आणि देशातल्या तरुणांनी कठोर परिश्रम आणि घाम गाळून तयार केलेली स्वदेशी उत्पादने खरेदी करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यांनी प्रत्येक घर स्वदेशीचे प्रतीक ठरावे आणि प्रत्येक दुकान स्वदेशी वस्तूंनी सजवण्याचे आवाहन केले. पंतप्रधानांनी नागरिकांना स्वदेशीप्रति त्यांची असलेली वचनबद्धता **''मी स्वदेशी खरेदी करतो, मी स्वदेशी विकतो''** असे अभिमानाने जाहीर करण्यास प्रोत्साहित केले आणि सांगितले की प्रत्येक भारतीयाच्या मनात ही मानसिकता रुजली पाहिजे. या परिवर्तनामुळे भारताच्या विकासाला चालना मिळणार आहे. सर्व राज्य सरकारांना त्यांच्या प्रदेशात संपूर्ण शक्ती आणि उत्साहाने उत्पादनाला प्रोत्साहन देऊन आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्मिती करून आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी मोहिमांना सक्रीय पाठिंबा देण्याचे आवाहन श्री. मोदी यांनी केले. केंद्र आणि राज्य एकत्रितपणे पुढाकार घेतील तेव्हा स्वावलंबी भारताचे स्वप्न पूर्ण होईल, प्रत्येक राज्याचा विकास होईल आणि भारत विकसित राष्ट्र होईल, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले. आपल्या भाषणाचा समारोप करताना, पंतप्रधानांनी जीएसटी बचत उत्सव आणि नवरात्री शुभ मुहूर्तासाठी शुभेच्छा दिल्या. ■

# देशभर 'जीएसटी बचत महोत्सव' उत्साहात सुरु




येत्या सणासुदीच्या हंगामात ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आणि मंदावलेल्या मागणीला चालना देण्यासाठी भारतीय उद्योगजगताने कंबर कसली आहे. वस्तू आणि सेवा करातील (जीएसटी) कपातीसचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक कंपन्यांनी आपल्या उत्पादनांच्या किमती कमी केल्या. जीएसटी दरकपात देशभर २२ सप्टेंबारपासून लागू झाली आहे. त्याला व्यापारी जगताने मोठ्या उत्साहात सकारात्मक प्रतिसाद दिला. काही कंपन्यांनी तर जीएसटी कपातीपेक्षाही जास्त सवलत देऊ केल्याने सणासुदीच्या काळात बाजारपेठेत खरेदीसाठी झुंबड उडेल आणि अर्थव्यवस्थेला नवी ऊर्जा मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.




### किंमत कपातीसाठी कंपन्यांची धावपळ

जीएसटी परिषदेने ३ सप्टेंबर रोजी विविध वस्तूंवरील कर कमी करण्याचा निर्णय घेतल्यापासून कंपन्यांनी युद्धपातळीवर तयारी सुरू केली आहे. सरकारच्या निर्देशांनुसार, वितरकांना नवीन किमती कळवण्यात आल्या आहेत, कंपन्यांच्या वेबसाईटवर जुन्या आणि नवीन किमतींची सविस्तर यादी प्रसिद्ध केली जात आहे आणि कारखान्यांमध्ये नवीन एमआरपी असलेल्या पॅकिंगचे उत्पादन वेगाने सुरू आहे. आईस्क्रीम पार्लर, किराणा दुकाने, पादत्राणांची दुकाने, तसेच गृहोपयोगी वस्तू आणि वाहन कंपन्यांनी आपल्या उत्पादनांना नवीन किमतीचे टॅग लावले आहेत.

### उद्योगजगतात उत्साहाचे वातावरण

या निर्णयामुळे उद्योगजगतात उत्साहाचे वातावरण आहे. 'शॉपर्स स्टॉप'चे सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक कविंद्र मिश्रा म्हणाले, ज्या ब्रँडस्वरील जीएसटी कमी झाला आहे, त्यांनी आमच्या स्टोअर्समध्ये किमती आधीच कमी केल्या आहेत. आता दसरा आणि दिवाळीच्या विक्रीसाठी आम्ही सज्ज आहोत. 'बस्किन रॉबिन्स' चालवणाऱ्या ग्रॅव्हिस फूडसचे सीईओ मोहित खट्टर यांच्या मते ग्राहकांना सरासरी १० ते ११ टक्के फायदा होणे अपेक्षित आहे.

### प्रमुख कंपन्या आघाडीवर

पार्ले प्रॉडक्टस् कंपनीचे उपाध्यक्ष मयंक शाह यांनी सांगितले की, ७ हजारांहून अधिक वितरकांना नवीन किमती कळवण्यात आल्या असून, सर्व उत्पादने नवीन एमआरपीसह बाजारात दाखल झाली आहेत.

**आयटीसी:** सुमारे ७० लाख दुकानांपर्यंत पोहोचणारी आयटीसी कंपनीदेखील आपल्या विक्रेत्यांना नवीन किमतींबद्दल माहिती देत आहे. काही काळ बाजारात जुन्या आणि नवीन दोन्ही किमतींची उत्पादने उपलब्ध असू शकतात, असे कार्यकारी संचालक हेमंत मलिक यांनी स्पष्ट केले.

**लिबर्टी शूज :** कंपनीचे कार्यकारी संचालक अनुपम बन्सल म्हणाले, आम्ही ३ हजार रुपयांपर्यंतच्या पादत्राणांच्या




### ट्रक, टेम्पो, व्हॅनच्या किमतीत मोठी घट

- अवजड ट्रक (कउत): २.८ लाख ते ४.६५ लाख रुपयांपर्यंत स्वस्त.
- हलके आणि मध्यम ट्रक: १ लाख ते ३ लाख रुपयांपर्यंत स्वस्त.
- बस आणि व्हॅन: १.२ लाख ते ४.३५ लाख रुपयांपर्यंत स्वस्त.
- छोट्या प्रवासी व्यावसायिक वाहने: ५२,००० ते ६६,००० रुपयांपर्यंत स्वस्त.
- पिकअप ट्रक: ३०,००० ते १.१ लाख रुपयांपर्यंत स्वस्त.




### टाटाच्या प्रवासी गाड्याही स्वस्त होणार

**प्रवासी कार आणि एसयूव्हीच्या किमतीत ६५,००० रुपयांपासून ते १.४५ लाख रुपयांपर्यंत कपात**

- टियागो: ७५,००० रुपयांनी स्वस्त.
- टिगोर: ८०,००० रुपयांनी स्वस्त.
- अल्ट्रोज: १.१० लाख रुपयांनी स्वस्त.
- पंच: ८५,००० रुपयांनी स्वस्त.
- नेक्सॉन: १.५५ लाख रुपयांनी स्वस्त.
- कर्व: ६५,००० रुपयांनी स्वस्त.
- हॅरियर:१.४० लाख रुपयांनी स्वस्त.
- सफारी: १.४५ लाख रुपयांनी स्वस्त.

किमती ५०० रुपयांपर्यंत कमी केल्या आहेत. यामुळे ग्राहक नॉनब्रँडेड वस्तूंऐवजी ब्रँडेड वस्तूंकडे वळतील, अशी अपेक्षा आहे.

**मदर डेअरी आणि रिलायन्स :** अगदी ५ आणि १० रुपयांच्या वस्तूंवरही ०.५० पैसे ते १ रुपयापर्यंतची कपात केली जात आहे. यूपीआय पेमेंटमुळे सुट्ट्या पैशांची समस्या येणार नाही. पनीरसारख्या उत्पादनांचे नवीन किमतीसह उत्पादन सुरू झाले आहे, असे मदर डेअरीचे व्यवस्थापकीय संचालक मनीष बंडलिश यांनी सांगितले.

**मारूती सुझुकीच्या किंमतीत घट**

देशातील सर्वात मोठा मार्केट शेअर असणारी कार उत्पादक कंपनी मारूती सुझुकीने आपल्या दोन मॉडेल्सच्या किंमतीत मोठी घट केली आहे. ही घट नवीन जीएसटी दर लागू झाल्यावर करण्यात आली आहे. मारूती सुझुकीने

# ‘मारुती’च्या ३० हजार गाड्यांची एकाच दिवशी विक्री

## जीएसटी दरकपातीच्या पहिल्याच दिवशी चारचाकी विक्रीचा विक्रम

■ मारुती सुझुकीने ३५ वर्षांच्या इतिहासात प्रथमच एका दिवसात तब्बल ३० हजार गाड्यांची डिलिव्हरी करत नवा विक्रम प्रस्थापित केला.

■ एवढेच नव्हे तर ८०हजार ग्राहकांनी नवीन गाड्यांची विचारणा केली. २२ सप्टेंबर पासून गेल्या तीन दिवसांत दररोज १५००० बुकिंग्सची नोंद झाली आहे.

■ फक्त मारुतीच नव्हे तर ह्युंडाईनेही ११००० डिलर बिलिंग्स करत गेल्या ५ वर्षांतील सर्वोच्च विक्री नोंदवली.

■ टाटा मोटर्सने २२ सप्टेंबरला १० हजार गाड्या विकल्या आहेत, तर अजून २२ हजार नवीन गाड्यांची विचारणा झाली आहे.

■ महिंद्रा, किया, एमजी या कंपन्यांची पण विक्रीची आकडेवारी जबरदस्त आहे.

**हे आकडे केवळ गाड्यांच्या विक्रीपुरते नाहीत, तर भारताच्या वाढत्या खरेदीशक्तीचे, सक्षम मध्यमवर्गाचे आणि मजबूत अर्थव्यवस्थेचे दर्शन घडवणारे आहेत. यामागे मोठा वाटा आहे मोदी सरकारच्या दूरदृष्टीचा. जीएसटी २.० सारख्या सुधारणा, ग्राहकाभिमुख धोरणे, मेक इन इंडिया व स्वदेशी उद्योगांना मिळालेला पाठिंबा यामुळेच आज भारत आत्मनिर्भरतेकडे झेपावणारा, जगाच्या बाजारपेठेत नवे मानदंड प्रस्थापित करणारा देश ठरतो आहे. हेच मोदींच्या नेतृत्वाचे आणि मोदीनॉमिक्सचे यश आहे!**

# नवीन जीएसटी दरांचा शेतकऱ्यांना होईल फायदा



■ ट्रॅक्टरची किंमत ४१ हजार ते ६३ हजार रुपयांनी कमी होणार.

■ पॉवर टिलरची किंमत ११,८७५ रुपयांनी कमी होणार.

■ सीड ड्रीलवरची किंमत ३,२२० रुपये ते ४,३७५ रुपयांनी कमी होणार.

■ मल्टीक्रॉप थ्रेशरवरीलची किंमत १४ हजार रुपयांनी कमी होणार.

■ हार्वेस्टरची किंमत १,८७,५०० रुपयांनी कमी होणार.

■ स्ट्रॉ रीपरवरीलची किंमत २१,८७५ रुपयांनी कमी होणार.

■ बेलरवरीलची किंमत ९३,७५० रुपयांनी कमी होणार.

■ सल्फ्यूरिक आम्ल, नायट्रिक आम्ल, अमोनिया, जैव कीटकनाशके आणि सूक्ष्म पोषक घटक यांसारख्या महत्त्वाच्या निविष्ठांवरील जीएसटी दर आता १२% आणि १८% वरून थेट ५% करण्यात आला आहे.




## चारचाकीही (कार) स्वस्त होणार

- टोयोटा (Toyota): ३.४९ लाख रुपयांपर्यंत सूट
- किआ (Kia): ४.४८ लाख रुपयांपर्यंत सूट
- हुंदाई (Hyundai): २.४ लाख रुपयांपर्यंत सूट
- रेनॉल्ट (Renault): ९६,३९५ रुपयांपर्यंत सूट
- महिंद्रा (Mahindra) : १.५६ लाख रुपयांपर्यंत सूट
- निसान (Nissan): १ लाख रुपयांपर्यंत सूट
- होंडा टू-व्हीलर्स (Honda Two-Wheelers): १८,८८७ रुपयांपर्यंत सूट (३५० सीसी पेक्षा कमी)






आपल्या S-Presso च्या किंमतीत जवळपास १ लाख २९ हजार ६०० रूपयांची घट केली आहे. त्यामुळे आता S-Presso ही गाडीची किंमत ही फक्त ३.५० लाखापासून सुरू होणार आहे. मारूती सुझुकीनं आपल्या अनेक गाड्यांच्या किंमतीत मोठी घट केल्याचं जाहीर केले. कंपनीची चांगली खपणारी मारूती वॅगनर, अल्टो, इग्निस या गाड्यांच्या किंमती जवळपास १ लाख २९ हजार रूपयांनी कमी झाल्या आहेत. ■

# मुंबई भाजपातर्फे एकाच दिवशी दीड लाख चष्म्यांचे वाटप

## एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद




**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त देशभरात साजरा होणाऱ्या सेवा पंधरवडा'चा एक भाग म्हणून मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमीत साटम यांच्या नेतृत्वाखाली नमो नेत्र संजीवनी अभियान उपक्रम राबविला आणि यात १.५ लाख मोफत चष्मे वाटप करण्यात आले. मुंबई भाजपाच्या या भव्य उपक्रमाची दखल एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस या मान्यवर संस्थांनी घेतली असून, त्यांनी या विक्रमाची अधिकृत नोंद केली आहे. एकाच दिवशी सर्वात जास्त मोफत चष्म्यांचे वाटप या श्रेणीत या विक्रमाची नोंद झाली आहे. याबाबत मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमीत साटम यांना विशेष मानपत्र प्रदान करण्यात आले.

आ. अमीत साटम यांनी सांगितले की, या उपक्रमांतर्गत मुंबईतील सर्व २२७ महानगरपालिका वॉर्डांमध्ये एकाच वेळी नेत्र तपासणी शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरांमध्ये मोफत डोळ्यांची तपासणी करण्यात आली आणि मोफत चष्मे वाटण्यात आले. एकाच दिवसात एकूण १.५ लाख मोफत चष्मे वाटण्यात आले, असे आ. अमीत साटम म्हणाले. सेवा पंधरवडा हा सेवा, जबाबदारी, सामूहिक प्रयत्न आणि भारतीय संस्कृतीचे मूल्य साजरे करण्यासाठी आयोजित केला आहे. हे केवळ सेवेचे कार्य नाही तर एक कर्तव्य आहे. पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आम्ही हा सामाजिक उपक्रम समर्पण भावनेने हाती घेतला. भविष्यातही असेच लोककल्याणकारी कार्यक्रम आयोजित केले जातील, असे आ.अमीत साटम म्हणाले.

आ. अमीत साटम यांनी पुढे सांगितले की, सेवा आणि समर्पण भाजपाचा पाया असून हा उपक्रम त्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. या मोहिमेचा प्राथमिक उद्देश मुंबईकरांच्या जीवनात एक नवीन दृष्टिकोन आणणे आणि समर्पण भावनेने त्यांची सेवा करणे हा होता, असे आ. अमीत साटम यांनी सांगितले. हजारो डॉक्टर, आरोग्यसेवा कर्मचारी, स्वयंसेवक आणि भाजपा कार्यकर्त्यांनी मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. तपासणी करण्यासाठी आणि चष्म्यांचे योग्य वितरण सुनिश्चित करण्यासाठी विविध ठिकाणी नेत्रतज्ज्ञ उपस्थित होते. ■






मुंबई– युवा मोर्चाद्वारे ’नमो युवा रन २०२५ फॉर नशा मुक्त भारत’ चा शुभारंभ– उपस्थिती– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य विकास व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. तेजस्वी सूर्या, मुंबई अध्यक्ष व आ. अमित साटम, युवा मोर्चा मुंबई अध्यक्ष तेजिंदर सिंग तिवाना, ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री अशोक सराफ, अभिनेते मिलिंद सोमण आदी.




पिंपरी चिंचवड– ‘नमो युवा रन’– उपस्थिती– आ. महेश लांडगे, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे आदी.




नाशिक- उपस्थिती- जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आ. देवयानी फरांदे, आ. सीमा हिरे, आ. राहुल ढिकले, जिल्हाध्यक्ष सुनील केदार, ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, विजय साने, गिरीश पालवे, युवा मोर्चाचे महानगराध्यक्ष प्रवीण भाटे, योगेश मैंद आदी.



सातारा- उपस्थिती- बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जिल्हाध्यक्ष आ. अतुल भोसले, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, धैर्यशील कदम, चित्रलेखा माने-कदम, चिन्मय कुलकर्णी, अविनाश खर्शीकर, सुनील काटकर, रामकृष्ण वेताळ आदी.




जळगाव- उपस्थिती- खा.स्मिता वाघ, आ.सुरेश भोळे, आ. मंगेश चव्हाण, महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, जळगाव पश्चिम जिल्हाध्यक्ष राधेश्याम चौधरी, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष भैरवी वाघ, प्रदेश सचिव भावेश कोठावदे, महानगर जिल्हाध्यक्ष महेश पाटील आदी.



ठाणे– रक्तदान शिबीर– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष संदीप लेले, डॉ. समीरा भारती, सचिन पाटील, विक्रम भोईर, तृप्ती पाटील, शीतल कारंडे, सागर बधे, विकास अच्छा आदी.




पनवेल– रक्तदान शिबीर– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जय म्हात्रे, अतुल पाटील, सरचिटणीस नितीन पाटील, अरुण भगत आदी.



अंबरनाथ– नमो रन– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. कुमार आयलानी, कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, गुलाबराव करंजुले–पाटील आदी.




ठाणे– नमो रन– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संदीप लेले, संजय वाघुले, मृणाल पेंडसे आदी.



नाशिक– रक्तदान शिबीर– उपस्थिती– जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आ. देवयानी फरांदे, आ.ॲड.राहुल ढिकले, महानगर जिल्हाध्यक्ष सुनिल केदार, विजय साने, लक्ष्मण सावजी, महेश हिरे, सुनिल देसाई, अमित घुगे, ॲड.श्याम बडोदे, धनंजय माने, दिगंबर धुमाळ, काशिनाथ शिलेदार, सुनिल बागुल, सुधाकर बडगुजर, अजिंक्य साने, राहुल कुलकर्णी, सचिन मोरे, उदय जोशी आदी.



नांदेड– स्वच्छता कामगारांचा सन्मान– उपस्थिती– पालकमंत्री अतुल सावे, खा.अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, संजय कौडगे, महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, उत्तर ग्रामीण जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, चैतन्य देशमुख आदी.



जालना– रक्तदान शिबीर– उपस्थिती– ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जिल्हा सरचिटणीस अनिल कोलते, गोविंद ढेंबरे, शंकर लाहमंगे, भगवान मात्रे, हरिश्चंद्र शिंदे, नंदकिशोर पिंगळे, वसंतराव जगताप, विक्रम साबळे आदी.



अंबाजोगाई– आरोग्य शिबीर– उपस्थिती– पर्यावरण मंत्री पकंजा मुंडे, आ. नमिता मुंदडा आदी.




कांदिवली पश्चिम– उपस्थिती– कविता साळुंके यांना प्रमाणपत्र देताना आ. योगेश सागर, ज्येष्ठ नेते विजय गिरकर, लीनाबेन देहरकर, प्रतिभा गिरकर, मंडल अध्यक्ष हिमांशु पारेख, संयोजक संजय सिंह, वॉर्ड अध्यक्ष भावेश देसाई आदी.



मालेगाव– उपस्थिती– जिल्हाध्यक्ष निलेश कचवे, शहराध्यक्ष देवा पाटील, माजी जिल्हाध्यक्ष दादासाहेब जाधव, सुरेश निकम, संयोजक निलेश सोनवणे, सरचिटणीस श्याम गांगुर्डे, ज्येष्ठ पदाधिकारी हरिप्रसाद गुप्ता, गणेश भालेराव, निलेश रोकडे, बापू वाघ, ॲड. योगेश निकम आदी.



श्रीगोंदा– स्वच्छता अभियान– उपस्थिती– आ. विक्रम पाचपुते, डॉ. विक्रम भोसले, कोळगाव सरपंच पुरुषोत्तम लगड, नितीन नलगे, अकिल इनामदार, गणेश लगड, सचिन भोस, बापूसाहेब कर्डिले, दादासाहेब लगड, उषा कर्डिले आदी.




पंढरपूर– रक्तदान शिबीर– उपस्थिती– माजी आमदार प्रशांत परिचारक, दिलीप घाडगे, कैलास खुळे, लक्ष्मण शिरसट, हरीष गायकवाड, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, प्रणव परिचारक, तानाजी वाघमोडे आदी.




सिंधुदुर्ग– दिव्यागांना साहित्य वाटप– उपस्थिती– जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, उपाध्यक्ष प्रसन्ना देसाई, अनिल शिंगाडे, श्यामसुंदर लोट, प्रकाश वाघ, सुनील तांबे, प्रकाश सावंत, प्रशांत कदम, विजय कदम आदी.



नमो नेत्र संजीवनी अंतर्गत मुंबई भाजपातर्फे चष्म्याचे वाटप- मुंबई अध्यक्ष आ. अमीत साटम.

मुंबई - नेत्र चिकित्सा शिबीर - उपस्थिती- प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, दक्षिण मुंबई जिल्हा उपाध्यक्ष नंदु तर्फे, दक्षिण मुंबई जिल्हा सरचटणीस संदीप घुगे, जयेश शहा, केतन बधेका, विक्रम ब्रह्मभट, संजय नीलवर्ण, चंदन भन्साळी, सुशील राणे, दिपाली मालुसरे, प्रमीर शाह, मुकेश गावकर, बलवंत गायकवाड.





मुंब्रा- स्वच्छता मोहीम- उपस्थिती- रीदा रशीद, मीनाज कुरेशी, वहिदा शेख, मेहक शेख, मुस्कान शेख, आरिफ खलिफे, सोहिल सय्यद, सरफराज सय्यद, फरीदा अन्सारी, रुस्तमा बेग आदी.



कुडाळ– वोकल फॉर लोकल– उपस्थिती– पालकमंत्री नितेश राणे, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, श्वेता कोरगांवकर, जिल्हा उपाध्यक्ष राजू राऊळ, बंड्या सावंत, संध्या तेरसे, संजय वेगुर्लेकर, आरती पाटील, अदिती सावंत, मुक्ती परब, विजय कांबळी, गजानन वेगुर्लेकर.

डोंबिवली– वोकल फॉर लोकल– उपस्थिती– कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, मंडल अध्यक्ष प्रिया जोशी, जुनी डोंबिवली मंडल अध्यक्ष पवन पाटील, जयप्रकाश सावंत, करना जाधव, राजन आभाळे, सुजय विचारे आदी.





रायगड– वोकल फॉर लोकल– उपस्थिती– ममता म्हात्रे, वर्षा ठाकूर, चारुशीला घरत, प्रीती जॉर्ज, सारिका भगत, डॉ. सुरेखा मोहोकर, दर्शना भोईर, रुचिता लोंढे, नीता माळी, सिद्धीका पुंजानी, नलिनी शेलार, संजीवनी मालवणकर आदी.




अकोला– आरोग्य शिबीर– उपस्थिती– आ. हरिशभाऊ पिंपळे, आशा देवगिरकर, डॉ. विद्या भरणे, अनिता पजई, डॉ. अभिजित चारथळ, डॉ. मोहिते, डांगे मॅडम, आरोग्य निरीक्षक विजय डांगे, नम्रता भिंगारे आदी.



धुळे– नमो नेत्र संजीवनी अभियान– उपस्थिती– अरविंद जाधव, भाऊसाहेब देसले, बाळासाहेब भदाणे, जितेंद्र बंब, अनिता पाटील, माधुरी माळी, प्रवीण पवार, प्रभाकर पाटील, आप्पा मिस्तरी, डॉ.अनिल पाटील, गुलाब नंदाळे, गोपाल माळी, हितेश पारीख, भरत भदाणे.



अकोला– दिव्यागांना सायकल वाटप– उपस्थिती– तालुकाध्यक्ष नंदू राऊत, मंडल अध्यक्ष प्रशांत ठाकरे, हर्षल रामेश्वर साबळे, आरती पोळकट, वैशाली बाहकर, रुपाली तिडके, राहुल अग्रवाल, श्रीकांत रामेकर, राजू नाचणे, भारत भगत आदी.

# विकसित भारताचा पाया

विकसित भारत २०४७ च्या प्रवासात निरोगी भारत महत्वपूर्ण आहे. भारत निरोगी असावा, पुढची पिढी निरोगी राहावी यासाठी आरोग्य सेवाही विकसित होणे तितकेच गरजेचे आहे. जेव्हा भारतातील लोकांना आधुनिक रूग्णालये आणि उपचारांसाठी आधुनिक सुविधा मिळतील, तेव्हा ते लवकरात लवकर बरे होतील. त्यांच्या ऊर्जेचा योग्य वापर होऊन उत्पादकताही वाढेल. याच संकल्पनेतून गेल्या ११ वर्षात आरोग्य क्षेत्रात आधुनिक प्रणाली विकसित झाल्या आहेत जिथे गरिबातील गरीब लोकांच्या आकांक्षा पूर्ण होत आहेत कारण समावेशन आधुनिक भारताच्या आरोग्य सुधारणांचा गाभा आहे.



**अशा** परिस्थितीत, आरोग्य क्षेत्रातील क्रांती आता निरोगी भारताकडून सुसंवादी भारतात, सुसंवादी भारताकडून सक्षम भारतात, सक्षम भारताकडून समृद्ध भारतात रूपांतरित झाली आहे, म्हणजेच अमृत काळातील भारताला विकसित राष्ट्र बनवण्याच्या सर्वात उत्साही प्रवासातील एक मौल्यवान अध्याय आहे. 'तुमचे आरोग्य, आमचा संकल्प' हे ध्येय मानून २३ सप्टेंबर २०१८ रोजी सुरू झालेल्या जगातील सर्वात मोठ्या आरोग्य योजनेला – आयुष्मान भारतला ७ वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने, आरोग्य क्षेत्रातील केंद्र सरकारचे उपक्रम विकसित भारतासाठी एक मजबूत आधार कसा बनत आहेत ते जाणून घेऊया...

१९ वर्षीय पार्थ सावलियाला सतत खोकला यायचा, ज्यामुळे त्याचे बालपण अडचणीचे होते आणि अभियंता होण्याचे त्याचे स्वप्नही उद्ध्वस्त झाले. अहमदाबादमधील सरकारी रुग्णालयात तपासणी केल्यानंतर असे आढळून आले की त्याच्या नाकाचे हाड (सेप्टम) वाकडे आहे, ज्याच्या उपचारासाठी (सेप्टोप्लास्टी) १५ हजार रुपये खर्च येईल. हा खर्च त्याच्या कुटुंबासाठी खूप जास्त होता. त्यानंतर त्याच्या वडिलांनी आयुष्मान भारत योजनेची मदत घेतली. या योजनेद्वारे संपूर्ण खर्च भागवण्यात आला, ज्यामुळे कुटुंबाचे एका महिन्याचे उत्पन्न वाचले आणि काही आठवड्यांतच पार्थ पुन्हा शाळेत जाऊ लागला.

आयुष्मान भारत योजनेचा कोट्यवधी लोकांना फायदा झाला आहे, मी त्यापैकी एक आहे. मला किडनीचा त्रास होता आणि या योजनेअंतर्गत बिहारमधील पाटणा येथे माझे उपचार झाले. देशातील गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांना या योजनेचा खूप फायदा होत आहे. ही योजना खूप प्रभावी आणि फायदेशीर आहे. आरोग्य लाभ सहज मिळण्याचे समाधान आणि कोणत्याही खर्चाशिवाय उपचार मिळण्याची शांती, हे शब्द आहेत बिहारचे ज्ञानेंद्र कुमार गुप्ता यांचे, ज्यांच्या किडनीच्या आजारावर आयुष्मान योजनेच्या मदतीने मोफत उपचार करण्यात आले आहेत. उपचारानंतर ज्ञानेंद्र यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून मनःपूर्वक आभार मानले. या क्रांतिकारी योजनेमुळे ज्ञानेंद्रसारख्या लाखो लोकांना लाभ मिळणे सोपे झाले आहे, जे सुमारे एक दशकापूर्वी वैद्यकीय खर्चाच्या ओझ्यामुळे दारिद्र्यरेषेखाली जात होते.

अशा स्थितीत पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची क्रांतिकारी योजना देशातील ६० कोटींहून अधिक गरीब-मध्यम वर्गातील वृद्धांसाठी वरदान ठरली आहे. देशात याआधीही सार्वत्रिक आरोग्यसेवेची चर्चा व्हायची मात्र प्रथमच एखाद्या सरकारने ५ लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांसह जगातील सर्वात मोठी आरोग्य सुविधा प्रदान केली आहे. यामुळेच लाभार्थी लोकांच्या मनातील भावना स्वाभाविकपणे दाटून येतात. ज्ञानेंद्र यांनी आपल्या मनातील भावना शब्दांमध्ये गुंफून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवल्या तेव्हा पंतप्रधान मोदी यांचीही सहजता आणि नागरिकांशी असलेल्या बंधांची भावना दाटून आली.

## आयुष्मान भारत : सार्वजनिक आरोग्याचे सुरक्षा कवच

**सार्वत्रिक आरोग्य सुविधेच्या दिशेने, आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (एबी–पीएमजेएवाय) ने भारताला जगातील सर्वात मोठी आरोग्य सुरक्षा शक्ती बनवले आहे. देशातील जवळजवळ ६० कोटी लोकसंख्येला ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार प्रदान करणे ही केवळ एक योजना नाही तर नवीन भारताचा आत्मविश्वास आहे जो संदेश देतो की आता कोणीही उपचारांच्या खर्चाने दबणार नाही, उलट ते अधिक मजबूत होऊन पुढे जातील. जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना २३ सप्टेंबर २०१८ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झारखंडमधील रांची येथून सुरू केली होती, जी आता गरीब आणि वंचित घटकांसाठी दर्जेदार उपचारांची हमी बनली आहे.**

## जम्मू–काश्मीर चा प्रत्येक नागरिक 'आयुष्मान'

**जम्मू आणि काश्मीर हे देशातील एकमेव राज्य आहे जिथे १००% लोकसंख्येला आयुष्मान भारतचा लाभ मिळत आहे. पंतप्रधान मोदींनी डिसेंबर २०२० मध्ये याची सुरुवात केली. सुरुवातीला राज्यातील फक्त ६ लाख कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळत होता, परंतु आता राज्यातील सर्व २१ लाख कुटुंबांना याचा लाभ मिळत आहे.**

बिहारमधील पाटणा येथील रहिवासी ज्ञानेंद्र यांना लिहिलेल्या पत्रातूनही हे स्पष्ट होते. त्यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे की, तुमच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याचे ऐकून मला खूप आनंद झाला. तुम्ही तुमच्या पत्रात आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून गेल्या काही दिवसांमध्ये मूत्रपिंडाच्या यशस्वी उपचारांबद्दल जी माहिती सामायिक केली आहे, त्यामुळे मनाला खूप समाधान लाभले आहे. ज्ञानेंद्र यांनी आपल्या पत्नात लिहिले आहे, तुमचे (पंतप्रधान मोदी) धाडस आणि व्यक्तिमत्व देशातील जनतेला दिलासा आणि मार्गदर्शन देत राहील. याला उत्तर देताना पंतप्रधान मोदी देखील आपल्या भावना शब्दांमधून व्यक्त करण्यापासून स्वतःला रोखू शकले नाहीत. त्यांनी लिहिले, वैद्यकीय खर्चामुळे कुटुंबांची आयुष्यभराची बचत एका झटक्यात संपुष्टात येताना मी पाहिले आहे. अनेक वेळा तर लोक या खर्चामुळे उपचार करून घेण्यासही कचरत होते. आज आयुष्मान भारत योजना हे सुनिश्चित करत आहे की एकही भारतीय उपचारांपासून वंचित राहणार नाही. योग्य उपचार मिळाल्यावर कशा प्रकारे एका व्यक्तीच्या आयुष्याला नवी उमेद आणि दिशा मिळते हे या योजनेने सिद्ध करून दाखवले आहे.

एक निरोगी व्यक्ती केवळ आपल्या कुटुंबाला आधार देत नाही तर राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत देखील सक्रीय भूमिका बजावते. या वास्तवाला धोरणे आणि योजनांशी जोडून, गेल्या ११ वर्षांमध्ये केंद्र सरकारने आरोग्य क्षेत्रात एका नवीन क्रांतीची सुरुवात केली आहे. आज देशात प्रत्येक गरिबापर्यंत उत्तम आरोग्य सुविधा पोहचवण्याचे अभियान जलद गतीने सुरु आहे. यासाठी आरोग्य शिक्षणात आवश्यक मोठ-मोठ्या सुधारणा करण्यात आल्या आहेत, त्याचबरोबर देशात वैद्यकीय शिक्षणासाठी जागा देखील वाढवण्यात आल्या आहेत. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत देशातील गावागावांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहचवल्या जात आहेत. जन औषधी योजनेच्या

## पंतप्रधान जन आरोग्य योजनेतील महत्वाचे मुद्दे

- ४१.९१+ कोटीहून अधिक आयुष्मान कार्ड बनले.
- ९.४२+ कोटी रुग्णांना या योजनेंतर्गत रुग्णालयात दाखल करण्यात आले.
- १७ हजार ६६६ सरकारी रुग्णालये.
- १५ हजार २४६ खाजगी रुग्णालये.
- ४०% आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांना आयुष्मान भारत अंतर्गत रुग्णालयात दाखल झाल्यावर दरवर्षी ५ लाख रुपयांच्या आरोग्य विम्याचा लाभ दिला जातो. त्याचा आधार सामाजिक-आर्थिक जात जनगणना-२०११ आहे.
- राज्ये/केंद्रशासित प्रदेशांनी बिगर-एसईसीसी डेटा स्रोतांचा वापर करून स्वतःच्या खर्चाने योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या वाढवली आहे.
- १.२५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या ९.४२ कोटींहून अधिक रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्याची परवानगी देण्यात आली.
- या योजनेचा लाभ २७ वैद्यकीय विशेष क्षेत्रातील १ हजार ९६० हून अधिक प्रक्रियांना होत आहे.



## आयुष्मान कार्ड बनवणे आणि पात्रता तपासणे आता अधिक सोपे

जर तुम्ही आयुष्मान भारतचे लाभार्थी असाल आणि आयुष्मान कार्ड बनवू इच्छित असाल तर तुम्ही तुमच्या जवळच्या UTIITSL केंद्रात जाऊन कार्ड बनवू शकता. तसेच, जर तुम्हाला या योजनेचे लाभार्थी आहात की नाही हे तपासायचे असेल तर तुम्हाला त्याबद्दलची माहिती येथे मिळेल.

**14555** या क्रमांकावर तुम्ही लाभार्थी आहेत की नाही ते जाणून घेण्यासाठी फोन करा.

**1800110770**

या क्रमांकावर मिस्ड कॉल द्या. ७०+ वयाच्या लोकांना आयुष्मान वय वंदना कार्ड कसे बनवायचे याबद्दल माहिती मिळेल.




## आयुष्मान आरोग्य मंदिर

**सामान्य लोकांना त्यांच्या घराजवळ मूलभूत आरोग्य सेवा देण्यासाठी, संपूर्ण आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात आयुष्मान आरोग्य मंदिरे बांधली जात आहेत. १५ जुलै २०२५ पर्यंत, देशात १,७८,१५४ आयुष्मान आरोग्य मंद्रि सुरू करण्यात आली आहेत. येथे उप-आरोग्य केंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे मजबूत करून व्यापक प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान केली जात आहे. आरोग्य मंदिरांमध्ये संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य रोग, प्रजनन आणि बाल आरोग्य सेवांसह एकूण १२ प्रकारच्या आजारांवर उपचार केले जात आहेत.**

माध्यमातून गरीब आणि मध्यमवर्गीयांना स्वस्त दरात औषधे उपलब्ध करुन दिली जात आहेत. गरोदर महिला आणि लहान मुलांचे लसीकरण यांचा मागोवा घेण्यासाठी एक डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. कोट्यवधी लोकांकडे एक अनोखे डिजिटल आरोग्य ओळखपत्र आहे. टेलिमेडिसिनमुळे आता कुणीही डॉक्टरपासून खूप दूर नाही. केंद्र सरकारच्या उपक्रमांमुळे एक उत्साहवर्धक प्रगती झाली आहे. एकूण आरोग्य खर्चाच्या टक्केवारीच्या तुलनेत वैयक्तिकरित्या केल्या जाणाऱ्या खर्चात देखील लक्षणीय घट झाली आहे. त्याचबरोबर, सरकारी आरोग्य खर्चातही उल्लेखनीय वाढ झाली आहे.

आतापर्यत जवळपास दोन लाख आरोग्य-कल्याण केंद्रे बांधण्यात आली आहेत. आता तालुका स्तरावर चांगली रुग्णालये आणि आधुनिक प्रयोगशाळांचे जाळे निर्माण

> **देशाच्या आरोग्य क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आम्ही एका राष्ट्रीय दृष्टिकोनासह एका नवीन राष्ट्रीय आरोग्य धोरणावर काम केले. स्वच्छ भारत अभियानापासून ते आयुष्मान भारत आणि आयुष्मान भारत डिजिटल मिशनपर्यंत असे अनेक प्रयत्न याचाच एक भाग आहेत.**
>
> **■ नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

करण्यावर विशेष काम केले जात आहे. आरोग्य क्षेत्रात स्वातंत्र्यानंतरच्या ६-७. दशकांमध्ये जी कामे झाली नाहीत ती मागील ११ वर्षांमध्ये झाली आहेत. देशात विक्रमी संख्येने नवीन एम्स आणि वैद्यकीय महाविद्यालये उघडण्यात आली आहेत. रुग्णालयांची वाढती संख्या हे दर्शवते की वैद्यकीय जागांची संख्या देखील तितक्याच वेगाने वाढत आहे जेणेकरून कुठल्याही गरीब मुलाचे डॉक्टर बनण्याचे जे स्वप्न आहे ते सहजरीत्या पूर्ण होईल. मध्यम वर्गातील कुठल्याही मुलाला नाईलाजाने वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात जावे लागणार नाही. वैद्यकीय जागा वाढवण्याचे एक अभियान सुरु आहे. मागील ११ वर्षामध्ये एमबीबीएस आणि एमडी च्या एकूण एक लाखांहून अधिक नवीन जागांची भर पडली आहे.

खरंतर अशा एका देशात जिथे आरोग्यसेवेची उपलब्धता एकेकाळी विशेषाधिकारांवर अवलंबून होती, त्या देशात पंतप्रधान मोदी यांनी सार्वजनिक आरोग्य सेवेचा पाया पुन्हा परिभाषित केला जेणेकरून कुणीही भारतीय वंचित राहू नये. २०१४ पूर्वी भारतात आरोग्य हे एक दुर्लक्षित क्षेत्र होते, इतके की स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही सार्वत्रिक आरोग्यसेवेची चर्चा केवळ कागदोपत्रीच मर्यादित राहिली. परंतु विद्यमान केंद्र सरकारने आयुष्मान भारत योजनेद्वारे ते प्रत्यक्षात साकारले आहे. आरोग्य खर्चात ८५% वाढ करण्यात आली आहे,ज्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात संसाधने पोहोचतील हे सुनिश्चित झाले आहे. २०१४ मध्ये पंतप्रधान मोदी सत्तेत येण्यापूर्वी भारतात आरोग्य सेवा गरिबांसाठी मोठा भार होता. कुटुंबांना अनेकदा वैद्यकीय उपचार आणि इतर मूलभूत गरजांमधून निवड करावी लागत होती. ही स्थिती झपाट्याने बदलत आहे. आरोग्यावर खिशातून होणाऱ्या खर्चात वेगाने घट झाली आहे.

## आता प्रत्येक घरात सुलभ आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा

भारताच्या आरोग्य सेवा व्यवस्थेत गेल्या ११ वर्षांमध्ये उल्लेखनीय बदल झाले आहेत. वर्ष २०१८ मध्ये, आयुष्मान भारत योजना सुरू करण्यात आली, ज्याचा उद्देश गरीब कुटुंबांना उपचारांवरील मोठ्या खर्चापासून वाचवणे हा होता. आज ही योजना सुमारे ४१ कोटी लोकांना लाभ पोहचवत आहे. यात विमा, आजाराला प्रतिबंध आणि डिजिटल तंत्रज्ञानावर भर देण्यात आला आहे, ज्यामुळे गरजू लोकांना स्वस्त आणि सहजरित्या उपलब्ध उपचाराची सुविधा मिळाली आहे. सुरुवातीपासूनच आयुष्मान भारत योजनेचा उद्देश दोन मोठ्या समस्या सोडवणे हा होता – गावांमध्ये चांगल्या आरोग्य सेवांची कमतरता आणि गरीब कुटुंबांवर उपचारांच्या खर्चाचा मोठा भार. २०१८ पूर्वी, गावांमध्ये राहणाऱ्या लोकांना अनेकदा या समस्यांना तोंड द्यावे लागत असे. या समस्या सोडवण्यासाठी सरकारने पंतप्रधान जन आरोग्य योजना (पीएम–जय) सुरु केली, ज्यामध्ये प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळू शकतात. अवघ्या सात वर्षांमध्ये आयुष्मान कार्ड मिळवणाऱ्यांची संख्या ४१ कोटींहून अधिक झाली आहे. हे केवळ आयुष्मान कार्ड नाही तर गरिबांसाठी जीवन कवच आहे. नागरिकांना त्यांच्या खिशातून करावा लागणारा उपचारांवरील खर्च झाला कमी आरोग्य क्षेत्रातील यशाचे सर्वात मोठे कारण हे आहे की लोकांना आता आपल्या

**गेल्या दशकात, आरोग्याशी संबंधित उपक्रमांना वित्तपुरवठा करण्याच्या बाबतीत लक्षणीय बदल दिसून आला आहे. केंद्र सरकारने आपल्या कल्याणकारी योजनांद्वारे उपचारांवरील सामान्य माणसाच्या खर्चाचा भार कमी केला आहे. २०१३–१४ पासून ते २०२१–२२ पर्यंत परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. २०१३–१४ मध्ये आरोग्यावरील एकूण खर्चात सरकारचा वाटा २८.६% होता आणि सामान्य लोकांचा वाटा ६४.२% होता. २०२१–२२ मध्ये उपचारावरील सामान्य लोकांचा खर्च कमी होऊन ३९.४% इतका राहिला. तर सरकारचा खर्च वाढून सुमारे ४८ टक्के झाला.**



खिशातून उपचारांवर पूर्वीइतका खर्च करावा लागत नाही. २०१४ मध्ये, जेव्हा आयुष्मान भारत योजना सुरू झाली नव्हती, तेव्हा लोक त्यांच्या उपचारांवरील सुमारे ६२% खर्च स्वतः करत होते. आता हे प्रमाण कमी होऊन केवळ ३८% वर आले आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या मदतीने देशातील लोकांची १.२५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक बचत झाली आहे. यासोबतच, जन औषधी केंद्रांमधून स्वस्त औषधे खरेदी करुन लोकांनी ३८ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक बचत केली आहे. 'आयुष्मान आरोग्य मंदिर' उपक्रमांतर्गत, सुमारे २ लाख निरामयता केंद्रे उघडण्यात आली आहेत. ही केंद्रे गावे आणि परिसरातील लोकांची, विशेषतः उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यादी आजारांनी ग्रस्त असलेल्यांची तपासणी करतात. या योजनेमुळे आतापर्यंत २०० कोटींहून अधिक तपासण्या करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे आजाराचे निदान लवकर होते आणि मोठ्या खर्चाच्या उपचारांची गरज कमी पडते. त्याचबरोबर, ऑक्टोबर २०२१ मध्ये सुरु झालेल्या 'पंतप्रधान आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान' अंतर्गत, ६४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून देशातील रुग्णालये सुधारण्यात आली आहेत. असे परिसर जे पूर्वी मागास होते तिथे आता गंभीर रुग्णांसाठी विशेष व्यवस्था, देखरेख केंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

### जेणेकरुन प्रत्येक वृद्ध व्यक्तिला मिळेल आरोग्याच्या चिंतापासून मुक्ती

भारतात वृद्ध व्यक्तींची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. एका अहवालानुसार २०२६ पर्यंत १७ कोटी, २०३६ पर्यंत सुमारे २३ कोटी तर वर्ष २०५० पर्यंत ३५ कोटी म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या २० टक्क्यांहून अधिक वृद्धांची संख्या होईल. गेल्या काही वर्षांमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या गुणोत्तरात सतत वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे केंद्र सरकारच्या वतीने दिल्या जाणाऱ्या आरोग्य, निवृत्तीवेतन, स्वयंरोजगार आणि स्वावलंबनाशी संबंधित योजना आहेत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी न केवळ दीर्घायुष्य जीवन जगावे तर सुरक्षित, सन्मानपूर्ण, सर्जनशील आणि प्रतिष्ठित जीवन देखील जगले पाहिजे. यासाठी आयुष्मान भारत योजनेत एक क्रांतिकारी बदल २०२४ च्या अखेरीस झाला. आता ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या प्रत्येक भारतीय नागरिकाला या योजनेत सहभागी करून घेण्यात आले, भले त्याचे उत्पन्न किंवा पार्श्वभूमी काही का असेना. यामुळे सुमारे ६ कोटी वृद्धांना उपचाराची सुविधा मिळू लागली. वयाच्या या टप्प्यावर जेव्हा आरोग्यविषयक चिंता अधिक सतावतात, त्यापासून मुक्ती मिळवून देण्याचा हा संवेदनशील प्रयत्न बनला आहे. आता वृद्धांना मोठ्या रुग्णालयांमध्येही मोफत उपचार मिळू शकतील. जानेवारी २०२५ पर्यंत ४० लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेत आपले नाव नोंदवले होते, ज्यामुळे त्यांना भविष्यात आपल्या आरोग्याची चिंता करावी लागणार नाही.

### महिलांसाठी वरदान ठरली योजना

महिला आणि आघाडीचे आरोग्य कर्मचारी आयुष्मान भारत योजनेची मोठी ताकद आणि लाभार्थी आहेत. या योजनेअंतर्गत सुमारे ४९ टक्के आयुष्मान कार्ड महिलांची आहेत तसेच रुग्णालयात भरती होणाऱ्यांमध्ये ४८ टक्के महिला आहेत. फेब्रुवारी २०२४ मध्ये सरकारने ३७ लाख आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांनाही त्यांची महत्त्वाची भूमिका ओळखून या योजनेत समाविष्ट केले. या सेविकांना सुरक्षा प्रदान करुन ही योजना भारतातील प्राथमिक आरोग्य सेवांना बळकटी देत आहे. भारताच्या आरोग्यसेवा क्षेत्रातील आणखी एक मोठे यश म्हणजे आयुष्मान भारत योजनेत दिल्लीचा समावेश. पूर्वी, राजकीय कारणांमुळे दिल्लीतील लोक या योजनेच्या लाभांपासून वंचित होते आणि त्यांना महागड्या खाजगी उपचारांवर अवलंबून राहावे लागत असे; परंतु पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ही योजना दिल्लीपर्यंत पसरविली, त्यामुळे आता आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांना मोफत आणि चांगल्या दर्जाचे उपचार मिळण्याची खात्री झाली आहे.

### सामाजिक हिताच्या योजनांनी बदलला चेहरामोहरा

निरोगी मनातच निरोगी विचार असतात. विकसित भारताच्या प्रवासात अस्वस्थ समाज किंवा अशिक्षित समाजाची कल्पनाही करता येत नाही. २१व्या शतकातील भारतात स्वप्ने पूर्ण करण्याचे साधन व्यक्तीपासून सुरू होते, कुटुंबापासून सुरू होते, परंतु जर लोकसंख्या शिक्षित नसेल, निरोगी नसेल तर ते घर आनंदी नसते आणि तो देश आनंदी नसतो. म्हणूनच आरोग्याशी संबंधित विविध पैलूंवरील सामाजिक हिताच्या योजना प्रत्यक्षात आणून केंद्र सरकारने क्रांतिकारी बदल घडवून आणले आहेत. आज प्रत्येकाकडे स्वतःचे पक्के घर असावे, यासाठी घर योजना, प्रत्येक घरात वीज, उज्ज्वला योजनेद्वारे प्रत्येक स्वयंपाकघरात मोफत स्वयंपाक गॅसची व्यवस्था करण्यात आली आहे, स्वच्छता अभियानांतर्गत १२ कोटी शौचालये बांधण्यात आली आहेत, जल जीवन मिशन सुमारे १६ कोटी ग्रामीण कुटुंबांसाठी स्वच्छ पाण्याची सुविधा सुनिश्चित करत आहे. आज सुमारे ६० कोटी भारतीयांना व्यापून आयुष्मान भारत योजना गरीब आणि नव-मध्यमवर्गीयांसाठी उच्च दर्जाची आणि परवडणारी आरोग्य सेवा सुनिश्चित करत आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य जर्नलपैकी एक, 'लॅन्सेट'ने आयुष्मान भारतचे कौतुक केले आहे आणि म्हटले आहे की ही योजना भारतातील आरोग्य क्षेत्राशी संबेचित असंतोष दूर करत आहे. या सर्व सामाजिक चिंता योजनांनी आरोग्य आव्हानाला पराभूत करण्यात परिवर्तनकारी भूमिका बजावली आहे. 'लॅन्सेट'ने त्यांच्या एका अभ्यासात असे म्हटले आहे की, आयुष्मान भारतमुळे कर्करोगावरील उपचार वेळेवर सुरू होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. रुग्णांना ३० दिवसात कर्करोगाचे उपचार मिळण्यात ९० टक्के वाढ दिसून आली. आता नवीन भारताने संकल्प केला आहे की आपण एकत्रितपणे असा भारत निर्माण करू जो स्वच्छ, निरोगी असेल आणि स्वराज्याचे स्वप्न पूर्ण करेल. ■

# सौर ऊर्जा प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती




> प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्यातील २,४५८ मेगावॅट क्षमतेचे ४५४ सौर ऊर्जा प्रकल्पांचे लोकार्पण. प्रधानमंत्री यांनी सौर ऊर्जा प्रकल्पातील लाभार्थ्यांशी साधला संवाद.

**सौर** ऊर्जा प्रकल्पांमुळे शेतीला दिवसा वीज उपलब्ध होत आहे ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न दुप्पट होत आहे. मात्र शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीवर भर देऊन कमी खर्चात जास्त उत्पन्न देणाऱ्या पीक पद्धतीचा वापर करावा. शेतीचे आरोग्य संवर्धन उपाय होणे ही काळाची गरज आहे. या सौर ऊर्जा प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले. दूरदृश्यप्रणालीद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यातील २,४५८ मेगावॅट क्षमतेच्या ४५४ सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. राजस्थान बांसवाडा येथे ऊर्जा तसेच विविध विकास योजनांचा लोकार्पण कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपण वांद्रे पूर्व प्रकाशगड येथून करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी, राज्यातील पी एम कुसुम सी – मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आणि पीएम कुसुम सी–बी – मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचे लाभार्थी शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्पातील विविध लाभार्थ्यांशी संवाद साधला.

सौर ऊर्जा प्रकल्पाचे खूप फायदे आहेत. शेतकऱ्यांना शेतीला दिवसा वीज उपलब्ध होते आहे त्याचबरोबर बारमाही पाण्याची व्यवस्था झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. आता शेतकऱ्यांनी केमिकलमुक्त शेती करण्यावर भर दिला पाहिजे. झिरो कॉस्ट फार्मिंगला देखील महत्त्व दिले पाहिजे. झिरो बजेट नैसर्गिक शेती ही अशी शेती पद्धत आहे, ज्यामध्ये रासायनिक खते, कीटकनाशके यांचा वापर कमी करून खर्च कमी केला जातो, ज्यामुळे शेतकऱ्यांची शेतीमध्ये आर्थिक गुंतवणूक वाचते आणि जमिनीचे आरोग्य सुधारते. त्याचबरोबर पारंपरिक शेतीऐवजी काळानुरूप बदलती शेती करणे गरजेचे आहे.

भारताला आज एक लाख करोड टन खाद्यतेलाची आयात करावी लागते. ही समस्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांनी खाद्यतेल बियांची लागवड करणे गरजेचे आहे.

त्याचबरोबर मिलेटचीदेखील सध्या खूप मागणी आहे हे लक्षात घेता त्या प्रकारच्या पद्धतीची पिके घेतली तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांची आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल होईल. राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे नैसर्गिक शेतीवरील व्याख्यान शेतकऱ्यांनी जरूर ऐकावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सौर ऊर्जा प्रकल्पातील विविध लाभार्थी शेतकऱ्यांचा परिचय करून दिला.

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधत जाणून घेतल्या प्रकल्पाच्या यशोगाथा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना प्रकल्पाची यशोगाथा प्रत्यक्ष लाभार्थ्यांशी संवाद साधून जाणून घेतल्या. नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील किकवारी येथील शेतकरी सुनील सिताराम काकुलते यांनी पीएम कुसुम सी – मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ४० एकर जमीन सिंचनाखाली आणली. यामुळे दरवर्षी २ लाख रुपये उत्पन्न वाढले आहे. ५० ते ६० लोकांना यामुळे रोजगार प्राप्त झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

अकोला जिल्ह्यातील बार्शी टाकळी तालुक्यातील भेंडी महळ येथील शेतकरी तुषार वानखेडे यांनी १० मेगावॅट पीएम कुसुम सी – मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना मध्ये सौर ऊर्जा प्रकल्पाची योजना ६.५ एकरामध्ये राबवली. यापूर्वी रात्री वीज नसल्यामुळे अडचणी निर्माण होत होत्या. शेतीला पाणी कमी पडत असल्यामुळे हरभरासारखे पीक घेतले जात होते. आता पपई आणि केळीचे पीक घेऊन ३५ हजार ऐवजी ८० हजार रुपयांचे उत्पन्न मिळत आहे, असे त्यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील सतेफाड मधील सुरत जटाळे यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेतून पाच एचपीचा पंप बसवला. या योजनेमुळे त्यांच्या शेतीच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली. पंप बसवल्यापासून त्यांचे वार्षिक उत्पन्न साठ हजार रुपयांवरून दीड लाख रुपयांपर्यंत गेले. शेतीमध्ये घरातीलच तीन व्यक्ती काम करत असून मुलाच्या शिक्षणासाठी आणि पुन्हा शेतीमध्ये उत्पन्न घेण्यासाठी आलेल्या नफ्याचा उपयोग करत असल्याचे त्यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यातील बापकाळ येथील शेतकरी ताई किशोर सावंत म्हणाल्या की, पीएम कुसुम बी – मागील त्याला सौर कृषी पंप योजनेमध्ये दोन एकर क्षेत्रासाठी तीन एचपीचा सोलर पंप बसवला आहे. यामुळे सोयाबीन पिकाच्या उत्पादनात वाढ झाली. त्याचबरोबर उरलेल्या विजेचा इन्हवर्टरच्या माध्यमातून घरात वापर करण्यात येतो, असेही त्यांनी सांगितले.

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माई वस्ती पेठ येथील माधुरी धुमाळ यांनी पीएम कुसुम सी – मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेत दहा मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प १० एकर मध्ये उभारला आहे. या परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वार्षिक पंधरा लाख उत्पन्न या प्रकल्पातून मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील वाकवड येथील चंदू पावरा या शेतकऱ्यांने पीएम कुसुम बी– मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमध्ये ७.५ एचपी क्षमतेचा सौर कृषी पंप बसवला. त्यामुळे दिवसा वीज उपलब्ध होऊन पाण्याच्या उपलब्धतेमुळे मका, गहू, भुईमूग या पिकांची पेरणी केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

सातारा जिल्ह्यातील गोपाळ महल्ले यांनी पीएम कुसुम सी– मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेत लाभ घेतला आहे. या सर्व प्रकल्पामुळे ग्रामपंचायतीला दरवर्षी पाच लाख रुपये मिळत असून या शेतकऱ्यांनी सतराशे लोकांना वीज पुरवठा केल्यामुळे शेतकऱ्यांची विजेची समस्या सुटली. यामुळे या भागातील शेतकरी दिवसा वीज उपलब्ध होत असल्यामुळे आनंदी असल्याचे त्यांनी सांगितले.

### राज्याचा देशात प्रथम क्रमांक

पीएम कुसुम सी–मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेत सहा लाख शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होत आहे. यामुळे ३२.०८ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे. तसेच इतर विविध योजनेतून राज्यात आतापर्यंत ६ लाख ४६ ६९४ सौर कृषी पंप बसविण्यात आले असून राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या योजनेमुळे २०.९५ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे. ■

## पांडुरंग म्हातुकडे यांची भाजपा ज्येष्ठ कार्यकर्ता आघाडी जिल्हाध्यक्षपदी निवड

**इचलकरंजी** येथील ज्येष्ठ नेते पांडुरंग बाबुराव म्हातुकडे यांची नुकतीच भाजप ज्येष्ठ नागरीक आघाडी कोल्हापूर जिल्हाअध्यक्षपदी निवड करण्यात आली. भाजप जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत जिल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक निंबाळकर यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. जनसंघामध्य कार्यरत असलेले १९६० पासून पांडुरंग म्हातुकडे यांनी १९६५ साली अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथे कच्छ सत्याग्रहात सहभाग घेतला, तसेच १९७१ सालच्या बांगलादेश मान्यता दिल्ली येथील सत्यग्रहात सहभागी झाले. १९७५ सालच्या आणीबाणीच्या काळात ४१ दिवसाचा तुरुगवास भोगला. जनसंघात कार्यरत असताना, इचलकरंजी शहराध्यक्ष, शहरमंत्री, जिल्हा उपाध्यक्ष म्हणून कार्य केले आहे. भारतीय जनता पार्टीमध्ये असताना इचलकरंजी शहर उपाध्यक्ष, जिल्हा अध्यक्ष व राज्य कार्यकारणी सदस्य म्हणून पार्टीमध्ये कार्यरत राहून जिल्हा व राज्य कार्यकारणी सदस्य म्हणून कार्य केले आहे. भाजपा ज्येष्ठ नागरीक कोल्हापूर जिल्हा अध्यक्षपदीचे प्रमाणपत्र खा. धंनजय महाडीक, प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, मंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. ■

## भाजपा धुळे जिल्हा ग्रामीण कार्यकारिणी जाहीर

**भाजपा** धुळे जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब रामकृष्ण खलाणे यांनी भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, विभागीय संघटन मंत्री तथा प्रदेश कार्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे यांच्या आदेशान्वये तसेच आ. अमरीश पटेल, केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष भामरे, आ. रामदादा भदाणे, आ. काशीराम पावरा व जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नेते यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे जिल्हा भाजपा कार्यकारणी घोषित खालीलप्रमाणे.

**जिल्हाध्यक्ष–** बापूसाहेब रामकृष्ण खलाणे, कापडणे ता.धुळे, **जिल्हा उपाध्यक्ष –** प्रा. अरविंद जाधव, रघुवीर बागल, चंद्रजीत पाटील, सोनी कदम, प्रदीप कोठावदे, प्रा. सविता पगारे, संग्रामसिंग राजपूत, देवेंद्र पाटील, अशोक सुडके, प्रवीण महाजन. **जिल्हा सरचिटणीस –** भाऊसाहेब देसले (संघटन सरचिटणीस), प्रा.डी एस गिरासे, इंजि. बाळासाहेब भदाणे, शैलेंद्र आजगे, प्रभा कोकणी, चिटणीस मीरा मनोहर पाटील. शांताराम पाटील, जयश्री पवार, दीपक गुजर, प्रवीण माळी, भैरवी शिरसाट, अनिल जैस्वाल, मिलिंद पाटील, जयंत पाडवी, कोषाध्यक्ष जगदीश पाटील, प्रसिद्धी व माध्यमप्रमुख जितेंद्र जैन. ■




**भारतीय मुस्लिम महासंमेलनासाठी जाणाऱ्या कार्यकर्त्यांना भाजपा सुफी संवाद अभियानाचे राष्ट्रीय सहप्रभारी आबिद अली चौधरी यांनी मुंबई रेल्वे स्थानकात निरोप दिला. या संमेलनासाठी हजारो मुस्लिम कार्यकर्ते दिल्लीला रवाना झाले.**






जीएसटी दरकपात जनसंपर्क अभियानात राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी दिल्लीतील व्यापारी वर्गाशी संपर्क साधला.




राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी भीलवाडा येथे स्थानिक व्यापाऱ्यांशी संवाद साधला.



उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी हरिद्वार येथे स्थानिक व्यापाऱ्यांशी संवाद साधला.



गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी पणजी बाजारपेठेत स्थानिक व्यापाऱ्यांची भेट घेतली.



सांगली येथे आ. सुधीर गाडगीळ यांनी औषध विक्रेत्यांशी संवाद साधला.



बुलडाणा– उबाठा गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटातील अनेक सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व पंचायत समितीच्या माजी सदस्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष आ. चैनसुख संचेती, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



डॉ. श्वेता चौगुले, अशोक माने यांचा भाजपत प्रवेश– उपस्थिती– खा. धनंजय महाडिक, माजी आमदार प्रकाश आवाडे, माजी आमदार सुरेश हळवणकर, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष राजवर्धन निंबाळकर, महेश जाधव आदी.



कराड तालुक्यातील कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश– उपस्थिती– सातारा जिल्हा अध्यक्ष आ. डॉ. अतुल भोसले, आनंदराव पाटील, सचिन पवार, कराड दक्षिण तालुकाध्यक्ष पै.धनंजय पाटील, मंडल अध्यक्ष राजेंद्र यादव आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp









प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com